# T14/AGR219/EE/20160308

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

---

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2) प्रत्येक उप–प्रश्न पाच गुणांचा आहे.

3) प्रत्येक उप–प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.

4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप–प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

   अ) महाराष्ट्रात फळे व भाजीपाला उत्पादनाला असणारा वाव स्पष्ट करा. 5

   ब) फळापासून प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मीती करण्याचे कोणतेही पाच प्रकार स्पष्ट करा. 5

   क) प्रक्रिया उद्योगासाठी कोणकोणत्या मनुष्यबळाची आवश्यकता असते ते सविस्तर लिहा. 5

   ड) हरितगृह उभारणीसाठी योजनेचे स्वरूप व अर्थसहाय्य याविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

   इ) भारतात पुढे येणाऱ्या काळासाठी प्रक्रिया उद्योगाची नवी दिशा कशी असेल ते उदाहरणासह स्पष्ट करा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

   अ) मानवी आहारात दुधाचे महत्त्व स्पष्ट करा. 5

   ब) जनावरामध्ये स्तनदाह टाळण्यासाठी कोणती काळजी घेणे गरजेचे आहे ते लिहा. 5

   क) दूध शीतीकरण करणे का अगत्याचे आहे हे लिहून त्याचे महत्व स्पष्ट करा. 5

   ड) कुक्कुटपालनाच्या प्रमुख पद्धती कोणत्या त्या लिहून बिछाना व पिंजरा पद्धती विषयी सविस्तर लिहा. 5

   इ) कुक्कुटपालनासाठी चांगली कोंबडी निवडण्याकरिता कोणतीही पाच मार्गदर्शक चिन्हे सविस्तर लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

   अ) रोपवाटिकेमध्ये खर्चाच्या कोणकोणत्या बाबी असतात त्याविषयी सविस्तर लिहा. 5

   ब) रोपवाटिकेसाठी मजुरांचे वेतनमान ठरवण्यासाठी कोणते निकष लावावेत ते स्पष्ट करा. 5

   क) विशेष रोपवाटिका म्हणजे काय ते लिहून त्याचे तोटे सविस्तर लिहा. 5

   ड) फ्लोरिस्ट शॉपची प्रमुख कार्ये कोणती ती स्पष्ट करा. 5

   इ) फ्लोरिस्ट शॉप व्यवस्थापनातील वित्त व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कृषिपर्यटन म्हणजे काय? कृषिपर्यटनाचे महत्त्व स्पष्ट करा. 5

ब) फार्महाऊसची स्थापना करण्यासाठी कोणत्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे ते लिहा. 5

क) कृषि पर्यटनाच्या जाहिरात व प्रचाराच्या प्रमुख प्रकाराविषयी लिहा. 5

ड) कृषि प्रदर्शनाचे महत्त्व स्पष्ट करा. 5

इ) कृषि पर्यटनाच्या नकाशानिर्मितीसाठी कोणत्या घटकांचा प्रामुख्याने समावेश करावा ते स्पष्ट करा. 5